**कोषागारात रोख देय अनुदान**

**अर्थसंकल्पीय अनुदान २०११-२०१२**

**ग्रामीण भागामध्ये विशेष घटक योजनेखाली अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत अनुदाने मंजूर/ मुक्त करणेबाबत (लेखाशीर्ष २२१५ ९५९५)**

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्र. ग्रापायो-१२११/प्र.क्र.३७ /पापु-०७

मंत्रालय, मुंबई -३२, दिनांक : २९ फेब्रुवारी,२०१२

वाचा:- १. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र. १५६/पापु-०७, दिनांक १८ नोव्हेंबर, २०११

२. शासन शुद्धीपत्रक, पा.पु.व स्व.वि., क्र. ग्रापाधो-११११/प्र.क्र.१५६/पापु-०७, दिनांक ३० जानेवारी, २०१२

३. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र. ग्रापायो-१२११/प्र.क्र.२१७/पापु-०७दिनांक ३० जानेवारी,२०१२

**प्रस्तावना:-**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त, ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राज्यामध्ये लागू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील अनुसुचित जातीच्या त्याचप्रमाणे नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये वैयक्तिक शौचालये त्याचप्रमाणे खाजगी नळ जोडण्या देणे अभिप्रेत आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी विशेष घटक योजनेखाली, लेखाशीर्ष २२१५ ९५९५ खाली एकूण रु.५७.०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.

सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षासाठी विधिमंडळाला सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०११ (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २०११ यांच्या अनुसुचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह ) विधिमंडळाने मंजूर केलेला आहे, आणि तो सन २०११ चा अधिनियम क्र.१७ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-८ दिनांक २१ एप्रिल, २०११ अन्वये प्रसिध्द करण्यात आला आहे.

या योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीपैकी डिसेंबर २०११ पर्यंत अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन दिलेली रु.४२.७५ कोटी इतकी तरतूद, संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये संबंधीत यंत्रणांना वितरीत करण्यात आली आहे.

या योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीपैकी फेब्रुवारी,२०१२ करीता आणखी रु.५.७० कोटी निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.सदर निधी संबंधित यंत्रणांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत ग्रामीण भागात घ्यावयाच्या उपाययोजनांसाठी, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.७०.०० लक्ष व सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना सोबतच्या विवरणापत्रातील स्तंभ-३ मध्ये दर्शविलेल्या वाटपानुसार रु.५००.०० लक्ष याप्रमाणे एकुण रु.५७०.०० (रुपये पाचशे सत्तर लक्ष फक्त) इतकी तरतूद मंजूर व मुक्त करण्यात येत असून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर आहरणासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. या अनुदानाच्या वितरणासाठी गावांच्या निवडीचा प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

१)जिल्ह्यातील निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेली गावे त्यापैकी अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

२)निर्मल ग्राम पुरस्कार मिळालेल्या गावांव्यतिरिक्त अन्य गावे, त्यापैकी अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबांची संख्या जास्त आहे.

वरीलप्रमाणे, जिल्हा स्तरावर निवडलेल्या गावांमध्ये या योजनेअंतर्गत कामे घेताना, सर्व अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबियांना घरगुती कनेक्शन्स त्याचप्रमाणे वैयक्तीक शौचालये उपलब्ध होतील, याप्रमाणे नियोजन करण्यात यावे.

३. सदर अनुदान संबंधित यंत्रणांना पुढील अटीवर रोख मुक्त करण्यात येत आहे.

अ) हे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेने खर्च करावे.

ब) ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणारा निधी जिल्हा परिषदेकडून ज्या नियमित खात्यांमध्ये जमा करण्यात येतो. त्याच खात्यामध्ये हा निधी जमा करण्यात यावा.

क) या योजनेअंतर्गत घेतलेल्या कामांचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था, नवी मुंबई यांचेकडे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत न चुकता सादर करावा.

ड) वरील मंजूर अनुदानाची उपयोगिता प्रमाणपत्रे शासनाकडे विहित प्रपत्रात सादर करण्यात यावी.

इ) तसेच मासिक विवरणपत्रानुसार (Cash Flow) अनुदान खर्ची घालण्यात यावे.

४. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला मुक्त करण्यात आलेला निधी मिळविण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव किंवा प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी (श्री.का.मा.विधाते) यांच्या सहीने तयार केलेले व उप सचिव (श्रीम.शैला ए.) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी प्रतिस्वाक्षरीत केलेले देयक अधिदान व लेखा

कार्यालय, मुंबई, यांना सादर करण्यात यावे. सदरहु रकमेचा धनादेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे नावाने देण्यात यावा.

५. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र. वाय-२, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा, १०२ ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०२) (२३) अनुसुचित जाती व नवबौद्ध कुटुंबियांना वैयक्तिक पाणी पुरवठा व नळ जोडणी देण्यासाठी सहाय्यक अनुदान (वेतनेतर) (२२१५ ९५९५) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व या आर्थिक वर्षासाठी त्याखालील मंजूर तरतूदीतून भागवावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.९७/व्यय ३ ,दि. २२/२/२०१२ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra .gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **२०१२०२२९१२१५२५१७००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(र.अं.खडसे)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
३. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
६. वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
८. सर्व जिल्हा परिषदांचे कार्यकारी अभियंता, (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग)
९. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०. सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
११. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र १- मुंबई/२-नागपूर ( लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता)
१४. मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा, मुंबई
१५. नियोजन विभाग/वित्त विभाग/सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
१६. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासन क्र.
३४.निवडनस्ती, कार्यासन क्र. पापु-०७

शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापायो-१२१२/प्र.क्र.०३७/पापु-०७, दिनांक: २९ फेब्रुवारी, २०१२ चे सहपत्र.

| अ.क्र. | जिल्हा परिषद | या शासन निर्णयान्वये उपलब्ध करून देण्यात येत असलेला निधी (रु.) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ठाणे | १८,२७,०००/- (रु.अठरा लक्ष सत्तावीस हजार फक्त) |
| २ | रायगड | २,८८,५००/-(रु.दोन लक्ष अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे फक्त) |
| ३ | रत्नागिरी | १,३२,०००/- (रु.एक लक्ष बत्तीस हजार फक्त) |
| ४ | सिंधुदुर्ग | २,०७,५००/- (रु.दोन लक्ष सात हजार पाचशे फक्त) |
| ५ | नाशिक | २२,९४,०००/- (रु.बाविस लक्ष चौ-याण्णव हजार फक्त) |
| ६ | धुळे | ५,८७,०००/- (रु.पाच लक्ष सत्याऐंशी हजार फक्त) |
| ७ | नंदुरबार | २,२२,५००/- (रु.दोन लक्ष बावीस हजार पाचशे फक्त) |
| ८ | जळगाव | १५,४२,५००/- (रु.पंधरा लक्ष बेचाळीस हजार पाचशे फक्त)) |
| ९ | अहमदनगर | २६,०७,०००/- (रु.सव्वीस लक्ष सात हजार फक्त) |
| १० | पुणे | ४०,९७,०००/- (रु.चाळीस लक्ष सत्याण्णव हजार फक्त) |
| ११ | सातारा | १३,२३,५००/- (रु.तेरा लक्ष तेवीस हजार पाचशे फक्त) |
| १२ | सांगली | १६,८६,०००/- (रु.सोळा लक्ष शहाऐंशी हजार फक्त) |
| १३ | सोलापूर | ३१,०९,५००/- (रु.एकतीस लक्ष नऊ हजार पाचशे फक्त) |
| १४ | कोल्हापूर | २४,१८,५००/- (रु.चोवीस लक्ष अठरा हजार पाचशे फक्त) |
| १५ | औरंगाबाद | २०,२३,०००/- (रु.वीस लक्ष तेवीस हजार फक्त) |
| १६ | जालना | ९,७३,५००/- (रु.नऊ लक्ष त्र्याहत्तर हजार पाचशे फक्त) |
| १७ | परभणी | ८,२०,०००/- (रु.आठ लक्ष वीस हजार फक्त) |
| १८ | हिंगोली | ५,४१,५००/- (रु.पाच लक्ष एकेचाळीस हजार पाचशे फक्त) |
| १९ | बीड | १५,१२,५००/- (रु. पंधरा लक्ष बारा हजार पाचशे फक्त) |
| २० | नांदेड | २६,७९,५००/- (रु.सव्वीस लक्ष एकोणऐंशी हजार पाचशे फक्त) |
| २१ | उस्मानाबाद | १३,२२,०००/- (रु.तेरा लक्ष बावीस हजार फक्त) |
| २२ | लातूर | २१,७४,०००/- (रु.एकवीस लक्ष चौ-याहत्तर हजार फक्त) |
| २३ | बुलढाणा | १२,९९,५००/- (रु.बारा लक्ष नव्याण्णव हजार पाचशे फक्त) |
| २४ | अकोला | ९,०६,०००/- (रु.नऊ लक्ष सहा हजार फक्त) |
| २५ | वाशिम | ८,७५,०००/- (रु.आठ लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) |
| २६ | अमरावती | २४,०२,०००/- (रु.चोवीस लक्ष दोन हजार फक्त) |
| २७ | यवतमाळ | १३,५९,५००/- (रु.तेरा लक्ष एकोणसाठ हजार पाचशे फक्त) |
| २८ | वर्धा | ८,५३,०००/- (रु.आठ लक्ष त्रेपन्न हजार फक्त) |
| २९ | नागपूर | ३७,४६,०००/- (रु.सदतीस लक्ष सेहेचाळीस हजार फक्त) |
| ३० | भंडारा | १०,८६,०००/- (रु.दहा लक्ष शहाऐंशी हजार फक्त) |
| ३१ | गोंदिया | ९,०२,०००/- (रु.नऊ लक्ष दोन हजार फक्त) |
| ३२ | चंद्रपूर | १५,९७,०००/- (रु.पंधरा लक्ष सत्याण्णव हजार फक्त) |
| ३३ | गडचिरोली | ५,८५,५००/- (रु. पाच लक्ष पंचाऐंशी हजार पाचशे फक्त) |
| ३४ | **सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई** | ७०,००,०००/- ( रु.सत्तर लक्ष फक्त) |
| | **एकूण** | **५,७०,००,०००** (रु.पाच कोटी सत्तर लक्ष फक्त) |

(र.अं.खडसे)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,1 ला माळा,मुख्य इमारत, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई -400 032.**

दू.क्र. 2284 6463, 2279 3009/ 3375/4128, फॅक्स क्र. 2282 8129

**संकेतस्थळ** : www.mahawssd.gov.in, Email- wssd_do7_rpolicy@maharashtra.gov.in, wssdpapu07@rediffmail.com

**क्र.ग्रापायो-1212/ प्र.क्र.37/ पापु-07** **दिनांक** : 29 फेब्रुवारी,2012

प्रति,

1.सदस्य सचिव, 2.कार्यकारी अभियंता

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,

जिल्हा परिषद(सर्व)

विषय- **अर्थसंकल्पीय अनुदान २०११-२०१२**

ग्रामीण भागामध्ये विशेष घटक योजनेखाली अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदाने मंजूर/ मुक्त करणेबाबत (लेखाशीर्ष २२१५ ९५९५)

संदर्भ- शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. ग्रापायो-

१२११/प्र.क्र.२१७/पापु-०७दिनांक ३० जानेवारी,२०१२

संदर्भाधिन शासन निर्णयान्वय ग्रामीण भागामध्ये विशेष घटक योजनेखाली अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकामधील कुटुंबांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेअंतर्गत २२१५ ९५९५ या लेखाशिर्षाखाली सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना रु.१५०.०० लक्ष व सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना त्यांच्या जिल्ह्यातील अनुसुचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात रु.४१२५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

सदर निधी वितरणास वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.९७/व्यय-३,दि.२२/२/२०१२ अन्वये मान्यता दिली आहे.तरी,कोषागारातून निधी आहारीत करताना सदर अनौपचारीक संदर्भ क्रमांक नमूद करावा.

(र. अं. खडसे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन